I O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** कोंडलवाडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0007 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/01/2025 00:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(c) |
| 4 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 23/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/01/2025
**Time From (वेळेपासून):** 13:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/01/2025 **Time (वेळ):** 23:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 021

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/01/2025 23:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पो स्टे कुंडलवाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विपुल सोमनाथ पटणे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गांधीनगर, बिलोली ताबिलोली ,कोंडलवाडी,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गांधीनगर, बिलोली ताबिलोली ,कोंडलवाडी,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9011162118

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भागवत टिकाराम नागरगोजे | | | 1. पो स्टे कुंडलवाडी ,होनी इप्परगा ताउदगीर जिलातुर,कोंडलवाडी, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | नारायण मारोतराव शिंदे | | | 1. पो स्टे कुंडलवाडी , कोकरकॉलनी मानवत तामानवत जिपरभ,कोंडलवाडी,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु चे 34नोटा | 17,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

17,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 23/01/2025

फिर्याद

मी विपुल सोमनाथ पटणे, वय 34 वर्ष, व्यवसाय-शेती व व्यापार (वाळु,गिटी,मुरुम वाहतुक) रा. गांधीनगर, बिलोली ता.बिलोली जि.नांदेड मो.न.9011162118

समक्ष पोलीस स्टेशन कुंडलवाडी, जि.नांदेड येथे हजर येवून तोंडी सांगून फिर्याद देतो की, मी वर नमुद ठिकाणी माझे परिवारासह राहण्यास असुन शेती व व्यापार(वाळु,गिटी,मुरुम वाहतुक) व्यवसाय करून माझे कुटूबाचा उदरनिर्वाह करतो. दिनांक 20/01/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचेकडे तक्रार दिली ती खालील प्रमाणे

माझेकडे एक हायवा टाटा कंपनिची गाडी असुन त्याचा नंबर एम.एच.43 बी.पी.7855 आहे. मी शासनामार्फत परवानगी देण्यात येणा-या रेतीघाटापैकी मिळेल त्या रेतीघाटावरून बिलोली व बिलोली परिसरात रेतीची शासकीय रॉयल्टी भरून ग्राहाकापर्यत वाहतुक करीत असतो. साधारण पाच दिवसापुर्वी गंजगाव येथील रेतीघाट चालु झाल्याने मला सदर रेती घाटातुन वाळु रॉयल्टी भरून घेवुन ग्राहकांना मागणी प्रमाणे पुरवायची होती. मी तेथे गेलो असतांना मला एका हायवा ड्रायव्हर (नाव माहित नाही ) यांचेकडुन समजले की, गंजगाव येथील घाटातुन वाळु वाहतुक करायची असल्यास पोलीसांना भेटावे लागेल अथवा वाहतुक करता येणार नाही. त्यावरून मी दिनांक 20/01/2025 रोजी कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक नारायण शिंदे यांना माझा मोबाईल नंबर 9011162118 वरून त्यांचा मोबाईल नंबर 9767411279 वर कॉल करून वाळुचे गाडीचे वाहतुक संदर्भात विचारले. पोलीस उप निरीक्षक शिंदे म्हणाले की, सहा पोलीस निरीक्षक नागरगोजे साहेबांना भेटून त्यांचे त्यांना बोलुन घ्या व मला वैयक्तीक नंतर भेटुन बोलु असे म्हणाले, त्यानंतर मी पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे जावुन सहा. पोलीस निरीक्षक, नागरगोजे साहेब यांची भेट घेण्यास गेलो. नागरगोजे साहेब पोलीस स्टेशन येथे नसल्याने मी नागरगोजे साहेबांना फोन लावला तेव्हा त्यांनी मला गंजगाव रोडवर येण्यास सांगीतले तेव्हा मी त्यांना माचनुर येथे भेटलो तेव्हा सहा.पोलीस निरीक्षक नागरगोजे साहेबांनी मला गंजगाव येथील घाटावरून वाळुची वाहतुक करायची असेल तर एका महिन्याचे मला 15,000/- द्यावे लागतील व पोलीस उप निरीक्षक शिंदे यांना 10,000/- हजार द्यावे लागतील असे सांगीतले. त्यावर मी नागरगोजे साहेबांना म्हणालो की, मी नियमाने रॉयल्टी भरतो तर 25 हजार कशाचे त्यावर ते म्हणाले की, रॉयल्टी भरून असेल तरी 25,000/- रू. महिन्याचे दिले शिवाय गाडी जाउ देणार नाही. त्यावर मी ठिक आहे साहेब उदया व्यवस्था करतो म्हणुन निघुन आलो.

पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथील सहा.पोलीस निरीक्षक नागरगोजे व पोलीस उप निरीक्षक, शिंदे हे गंजगाव रेती घाटावरून बिलोली शहरात व परीसरात रेतीची वाहतुक करण्यासाठी मला 25,000/- रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक 20/01/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे पोलीस उप अधीक्षक श्री पवार यांना तोंडी तक्रार सांगीतली त्यांनी श्रीमती प्रिती जाधव, पोलीस निरीक्षक यांना बोलावून घेतले व मी त्यांना तोंडी तक्रार सांगीतली त्यांनी माझी तक्रार संगणकावर टंकलीखीत करून प्रिंट काढली होती.

माझे वरिल तक्रारीचे अनुशंगाने व मला दिलेल्या सुचने प्रमाणे मी दिनांक 21/01/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथील पोलीस निरीक्षक श्रीमती प्रिती जाधव व त्यांचे सापळा कार्यवाही कामी उपस्थित शासकिय पंच क्र 1) चेतन सखाराम पालेपाड वय 27 वर्ष व्यावसाय-नोकरी पद-कनिश्ठ सहाय्यक (लेखा),नेमणुक



Scanned with CamScanner

अधीक्षक अभियंता कार्यालय, महावितरण, नांदेड 2) मारोती सटवाजी खंडागळे, वय 40 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद-निम्नस्तर लिपिक (मास), नेमणुक अधीक्षक अभियंता कार्यालय, महावितरण, नांदेड व सापळा पथकातील पोलीस अंमलदार पोहेकॉ/राजेष राठोड ,पोहेकॉ/बालाजी मेकाले, पोकॉ/ईष्वर जाधव, यांचे सह कुंडलवाडी परिसरात कुंडलवाडी ते बिलोली जाणारे रस्त्यावर सुरक्षीत ठिकाणी भेट झाली. सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक प्रिती जाधव यांनी पंचाची व सापळा पथकातील सर्व सदस्याची ओळख करून दिली. त्यानंतर मी पंचा समक्ष माझी तोंडी तक्रार सांगितली. त्यानंतर पो.नि. श्रीमती प्रिती जाधव यांनी त्यांचेकडे दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी तक्रार वाचुन मी दिलेली लेखी तक्रार व पंचा समक्ष तोंडी सांगितलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री करून सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी सहया केल्या.ज्यावर माझी व पोलीस निरीक्षक प्रिती जाधव मॅडम यांनी पुर्वीच सहया केल्या आहेत.

त्यानंतर पो.नि. श्रीमती प्रिती जाधव यांनी लाच मागणी पडताळणीचा उद्देष सांगुन मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली.त्यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ/ईष्वर जाधव यांनी पो.नि. प्रिती जाधव, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. श्रीमती प्रिती जाधव यांनी दोन्ही पंच, सापळा पथक व मला लाचमागणी पडताळणी कार्यवाही अनुशंगाने सुचना दिल्या. त्यानंतर वेळ 16.10 वा. पोकॉ/ईष्वर जाधव यांनी पोनि.प्रिती जाधव यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात घालून दिल्याने लाचमागणी पडताळणी करीता मी व सोबत पंच क्रमांक 1 चेतन पालेपाड असे माझी कार क्रमांक एमएच 03 ए.आर.2123 ने पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे रवाना झालो. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे पोहचल्यानंतर लोकसेवक शिंदे यांची भेट घेण्याकरीता त्यांचे कॅबीन मध्ये गेलो असता तेथे लोकसेवक शिंदे हे मला भेटले त्यावेळी लोकसेवक शिंदे यांनी मला म्हणाले की, तुम्हाला माहीत आहे की त्यातले अर्धा हे करतात इकड तिकड सातच हे करतात, तुमच्यासाठी एखादा अजुन कमी करा, पण कोणाला म्हणु नका, साहेबाचे सात साडे सात तुम्ही पाचच करा, पण कोणाला म्हणु नका दोन असेल तर 15 दिले म्हणुन सांगा. त्यानंतर मी त्यांना होकार देवुन थोड्या वेळात आणुन देतो असे म्हणालो व मी तेथुन पंच क्र.1 यांचे सह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी वेळ 16.34 वा. परत आलो. तेव्हा पोकॉ/जाधव यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर घेवुन बंद केले. त्यानंतर पो.नि श्रीमती जाधव यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना लाचमागणी पडताळणी अनुशंगाने विचारपुस केली व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण पो.नि. श्रीमती जाधव, दोन्ही पंच, सापळा पथक यांनी ऐकले.

मी सांगितलेली हकिकत तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण यावरून लोकसेवक शिंदे यांनी माझेकडे असलेल्या हायवाने बिलोली शहरात व बिलोली परिसरात गंजगाव येथील रेती घाटातुन रेतीची वाहतुक करण्यासाठी माझेकडे दिनांक 21/01/2025 रोजी 5,000/- रूपयांची लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक 22/01/2025 रोजी वेळ 13.13 वा. पोकॉ/ईष्वर जाधव यांनी पोनि. प्रिती जाधव यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात घालून दिल्याने लोकसेवक नागरगोजे यांची लाचमागणी पडताळणीचे अनुशंगाने भेट घेण्यासाठी मी व सोबत पंच क्रमांक 1 चेतन पालेपाड असे माझे कारने ने पोलीस स्टेषन कुंडलवाडी येथे रवाना झालो.

त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे पोहचल्यानंतर लोकसेवक नागरगोजे यांची भेट घेण्यासाठी पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे गेलो तेथे लोकसेवक नागरगोजे बाहेर तपासकामी गेल्याचे समजले त्यानंतर लोकसेवक शिंदे यांची भेट घेण्याकरीता त्यांचे कॅबीन मध्ये गेलो असता तेथे लोकसेवक शिंदे यांना मी माझे गाडी संदर्भाने जरा रिक्व्हेस्ट आहे साहेबांना बोला नंतर त्रास होवु नये असे बोललो असता दुस-या लोकांनी वीस पण दिलेत असे म्हणाले मी त्यावर वीस हजार रूपये का म्हणालो असता त्यांनी दिलेत असे असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना ठिक आहे असे म्हणुन तेथुन पंच क्र.1 यांचे सह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी वेळ 13.47 वा. परत आलो.तेव्हा पोकॉ/जाधव यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर घेवुन बंद केले. त्यानंतर पो.नि श्रीमती जाधव यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना लाचमागणी पडताळणी अनुशंगाने विचारपुस केली व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाशण पो.नि. श्रीमती जाधव, दोन्ही पंच, सापळा पथक यांनी ऐकले त्यानंतर पुढील कार्यवाही दिनांक 23/01/2025 रोजी करण्याचे ठरवले.

त्यानंतर दिनांक 23/01/2025 रोजी 10.44 वा लोकसेवक नागरगोजे यांची लाचमागणी पडताळणी करीता मी व पंच क्रमांक 1 असे पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे गेलो. लोकसेवक नागरगोजे हे लोकसेवक शिंदे यांचे रूममध्ये बोलत असल्याने माझी दोघांशी एकत्रित भेट झाली. सदर भेटी दरम्यान लोकसेवक नागरगोजे म्हणाले की, बोललो शिंदे साहेबाला मी, त्यावर लोकसेवक शिंदे म्हणाले की, तुमचा विषय सांगितला मी, मी बोललो साहेबांना काल तुम्हाला माहित नाही, त्याच्यासाठी काल लई बिजी होते. त्यावर मी म्हणालो की, गाडी नंबर सरांना सांगा एकवेळस,



Scanned with CamScanner

त्यावर लोकसेवक शिंदे म्हणले की, हो मी सांगतो सरांना, त्यावर मी माझे गाडी नंबर 7855 चालेल सर असे सांगीतले, त्यावर लोकसेवक नागरगोजे म्हणाले की, "हो." त्यानंतर लोकसेवक नागरगोजे रूमचे बाहेर गेल्यानंतर लोकसेवक शिंदे म्हणाले की, तुमच्या समोरच बोललो ते तुम्ही करून टाका. त्यानंतर लोकसेवक शिंदे यांनी माझा गाडी नंबर मागीतला व मी त्यांना एम.एच.43 बी.पी.7855 असा गाडी नंबर असल्याचे सांगीतले. त्यानंतर शिदे म्हणाले की, हो अता इकड बघा तुमचा भी फायदा करून देतो त्यांना दहा दया आणि माझे सात टोटल सतरा दया असे म्हणाले त्यानंतर मी त्यांना होकार देवुन थोड्या वेळात आणुन देतो असे म्हणालो व मी तेथुन पंच क्र.1 यांचे सह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी वेळ 11.18 वा. परत आलो.तेव्हा पोकाँ/जाधव यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर घेवुन बंद केले. त्यानंतर पो.नि श्रीमती जाधव यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना लाचमागणी पडताळणी अनुशगाने विचारपुस केली व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण लॅपटॉपमध्ये टाकुन ध्वनिमुद्रित झालेले संभाषण पो.नि. श्रीमती जाधव, दोन्ही पंच, सापळा पथक यांनी ऐकले. त्यानंतर पो.नि. श्रीमती जाधव यांनी लोकसेवक नागरगोजे व शिंदे यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावायचा असल्याचे सांगुन मला व दोन्ही पंचाना सापळा पुर्व कार्यवाहीचा उद्वेष समजावून सांगितला. पो.नि.श्रीमती जाधव यांचे सुचनेवरुन पोहेकाँ/मेकाले यांनी अँथ्रासिन पावडर चे गुणधर्म व अँल्ट्राव्हाईलेट टॉर्च कार्यवाहीची माहिती सांगुन त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पो.नि. श्रीमती जाधव यांनी सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक शिंदे यांनी माझेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईषारा करायचा ते सांगीतले. त्यानंतर माझी अंगझडती घेवून लोकसेवक शिंदे यांना देण्यासाठी माझेकडील 17,000/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 34 चलनी नोटा घेवुन त्यास अँथ्रासिन पावडर लावुन माझे जवळ दिले.
त्यावेळी पो.नि. श्रीमती जाधव यांचे सुचनेवरुन पोकाँ/ईष्वर जाधव यांनी डिजीटल व्हाईस रेकाँर्डर चालु करून माझे गळयात दोरीच्या साहयाने लटकावुन दिले. त्यांनतर मी व पंच क्र. 01 चेतन पालेपाड असे मोटार स्कुटी क्रमांक एमएच.26 सी.जी.8324 ने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणा पासुन वेळ 13.35 वा. रवाना झालो. आमचे पाठीमागे थोडे अंतर राखुन सापळा पथक खाजगी चारचाकी वाहनाने आमच्या पाठीमागे आले. मी व पंच क्र.1 असे पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे पोहचल्यावर पोलीस उप निरीक्षक नारायण शिंदे यांचेकडे जावुन त्यांना सर आणले पैसे असे म्हणुन माझे जवळील रक्कम 17,000/-रूपये दिले व मोजायची गरज आहे का? असे म्हणाल्यावर लोकसेवक पोलीस उप निरीक्षक शिंदे यांनी नाही नाही, काही गरज नाही, गाडीचा नंबर घेतलाय मी, तुम्ही बिनधास्त रहा असे म्हणाले.
त्यानंतर सापळा पुर्व कार्यवाही वेळी पो.नि.प्रिती जाधव यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे सापळा पथकास दिसेल अशा प्रकारे मी नियोजीत इषारा दिला. त्यावेळी लागलीच सापळा पथक हे पोलीस स्टेशन कुंडलवाडी मध्ये पंच क्रमांक 1 पालेपाड यांचेसह पोलीस उप निरीक्षक शिंदे यांचे रूममध्ये गेले व पुढील कारवाई केली.
तरी माझेकडे असलेल्या टाटा कंपनीचा हायवा गाडी नंबर एम.एच.43 बी.पी.7855 ने शासनामार्फत परवानगी देण्यात आलेल्या गंजगाव येथील रेतीधाटावरून बिलोली व बिलोली परिसरात रेतीची षासकीय रॉयल्टी भरून ग्राहाकापर्यत वाहतुक करतेवेळी हायवा गाडीवर कोणत्याही प्रकारची कारवाई न करण्यासाठी कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक भागवत टिकाराम नागरगोजे व पोलीस उप निरीक्षक नारायण शिंदे यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्याकरीता अनुचीत गैरलाभ मिळविण्या करीता लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवक शिंदे यांनी स्वतः साठी व सहा.पोलीस निरीक्षक नागरगोजे यांच्यासाठी लाचेची रक्कम स्वतः स्वीकारली व स्वतःचे ताब्यात बाळगली आहे. म्हणुन त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये कायदेषीर कार्यवाही होणेस माझी फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी वाचून पाहिली असता ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SHANKAR Lalu CHAVAN
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):** POBN68511
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खब्ररीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** DIPAK SAHEBRAO M
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN85107

कार्यालय पो.स्टे. कुंडलवाडी जि.नांदेड

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन कुंडलवाडी



Scanned with CamScanner